# महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोग

महाराष्ट्र राज्यामध्ये नागरिकांना सेवेचा हक्क देणारा क्रांतीकारी कायदा म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५. या कायद्यान्वये राज्याच्या नागरिकांना पारदर्शक, गतिमान व कालबध्द सेवा मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्याची काटेकोर अंमलबजावणी सूनिश्चित करण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. आयोगाचे प्रमुख राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, श्री.स्वाधीन क्षत्रिय आहेत. ते आपल्या राज्याचे माजी मुख्य सचिव आहेत.

या कायद्यांतर्गत कोणत्या सेवा नागरिकांना प्राप्त करुन घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे, ही माहिती आपण आर.टी.एस. महाराष्ट्र या मोबाईल ॲप वर किंवा आपले सरकार वेब पोर्टल वर पाहू शकता. सेवा प्रदान करताना विलंब झाल्यास किंवा संयुक्तिक कारण नसताना सेवा नामंजूर करण्यात आली तर नागरिक प्रथम अपील, द्वितीय अपील वरिष्ठ अधिकाऱ्याकडे व तिसरे आणि शेवटचे अपील आयोगाकडे दाखल करु शकतात.

| | | |
|---|---|---|
| **आयोगाचा कार्यालयीन पत्ता** | : | **राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त कार्यालय,<br>निर्मल इमारत, दुसरा मजला, नरिमन पॉईंट,<br>मुंबई – ४०० ०२१.** |
| **दूरध्वनी** | : | **०२२ – ६६५००९१८** |
| **ई- मेल** | : | **ccrts@maharashtra.gov.in** |
| **आयोगाचे उपसचिव** | : | **श्री.संजय काटकर** |

---